**मे. बळीराजा साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १४८, १४९, १५१, १५२, १५८, १६४, १६५ व १६६, कानडखेड, ता. पुर्णा, जि. परभणी या उद्योगाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्प ज्यामध्ये साखर कारखान्याची उत्पादन क्षमता ३५०० टीसीडी ते १०००० टीसीडी पर्यंत वाढविणे आणि सहवीज निर्मिती १५ मेगावॅट ते ४० मेगावॅट उत्पादन करणे बाबत दिनांक ०७/०५/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता प्रकल्पाचे स्थळ मे. बळीराजा साखर कारखाना लिमिटेड, कानडखेड, ता. पुर्णा, जि. परभणी येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्तः -**

मे. बळीराजा साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १४८, १४९, १५१, १५२, १५८, १६४, १६५ व १६६, कानडखेड, ता. पुर्णा, जि. परभणी या उद्योगाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्प ज्यामध्ये साखर कारखान्याची उत्पादन क्षमता ३५०० टीसीडी ते १०००० टीसीडी पर्यंत वाढविणे आणि सहवीज निर्मिती १५ मेगावॅट ते ४० मेगावॅट उत्पादन करणे बाबत दिनांक ०७/०५/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता प्रकल्पाचे स्थळ मे. बळीराजा साखर कारखाना लिमिटेड, कानडखेड, ता. पुर्णा, जि. परभणी येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई-२८/२०२५ पत्र क्रं. बी.ओ./जे.डी.(डब्ल्यूपीसी)/पीएच/बी-२५०४०८-एफटीएस-०१७९, दि. ०८/०४/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. **श्री. जीवराज डापकर** : **अध्यक्ष**
उपविभागीय दंडाधिकारी,
उपविभागीय कार्यालय, गंगाखेड

२. **श्री. मनिष होळकर** : **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर.

३. **श्री. सो. म. कुरमुडे** : **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, परभणी.

होळकर

श्री. सो. म. कुरमुडे, समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, परभणी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली, त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. बळीराजा साखर कारखाना लिमिटेड, गट नं. १४८, १४९, १५१, १५२, १५८, १६४, १६५ व १६६, कानडखेड, ता. पुर्णा, जि. परभणी या उद्योगाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्प ज्यामध्ये साखर कारखान्याची उत्पादन क्षमता ३५०० टीसीडी ते १०००० टीसीडी पर्यंत वाढविणे आणि सहवीज निर्मिती १५ मेगावॅट ते ४० मेगावॅट उत्पादन करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणीसाठी जमलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास शासनाची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. बळीराजा साखर कारखाना लिमिटेड यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दि. २२/०२/२०२५ रोजी प्राप्त झाला. मा. जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपविभागीय दंडाधिकारी, गंगाखेड यांना सदर लोकसुनावणी घेण्यासाठी निर्देशित केले होते त्याअनूषंगाने उपविभागीय दंडाधिकारी, गंगाखेड यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. ०७/०५/२०२५ वेळ-सकाळी १०:३० वाजता घेण्याचे निश्चित करण्यात आले. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. ०३/०४/२०२५ रोजी दैनिक सकाळ, दैनिक देशोन्नती (मराठी भाषा) व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी भाषा) या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, परभणी.
३. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, गंगाखेड, जि. परभणी.
४. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय पुर्णा, ता. पुर्णा, जि. परभणी.
६. मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय पुर्णा, जि. परभणी.
७. ग्रामपंचायत कार्यालय कानडखेड, ता. पुर्णा, जि. परभणी.
८. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, देवकृपा इमारत, पहिला मजला, रंगनाथ महाराज नगर, नांदखेडा रोड, ता.जि. परभणी.
९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, ता.जि. छत्रपती संभाजी नगर.
१०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
११. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

होळकर

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, परभणी येथे तीन सूचना इमेलद्वारे खालीलप्रमाणे प्राप्त झालेल्या आहेत-

१. श्री. नवीन कुमार पल्ले, युनायटेड, सोशल सर्व्हीसेस सोसायटी, तेलंगना.
२. श्री. व्ही. सुनंदा रेडडी, पर्यावरणवादी, तेलंगना.
३. श्री. रंगाराव कोथाकोंडा, सेव्हअर्थ, मेट्रो अर्बन व रूरल डेव्हलपमेंट सोसायटी, तेलंगना.

सदर सुचनांची नोंद घेण्यात आली आहे व सोबत जोडण्यात येत आहेत. तरी उपस्थित नागरिकांमंधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदवू शकतात. तदनंतर त्यांनी सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

श्री ए. जी. येवले, प्रकल्प सल्लागार, मे. टेक्नोग्रीन सोल्यूशन्स लिमीटेड, पुणे यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- प्रस्तावना, पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचे स्थळ, प्रकल्पाचे गुगल नकाशा, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, प्रकल्पाचे अध्ययन क्षेत्र, प्रकल्प स्थळाची सध्याची छायाचित्रे, प्रस्तावित प्रकल्पाची प्रमुख वैशिष्टये, प्रस्तावित प्रकल्पाची मुलभूत आवश्यकता, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील वायूची गुणवत्ता तपासणी, वायू गुणवत्तेचा निष्कर्ष, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता तपासणी, ध्वनी गुणवत्तेचा निष्कर्ष, अध्ययन क्षेत्रातील पाणी गुणवत्ता तपासणी, भुतलावरील पाणी गुणवत्तेचा निष्कर्ष, भुजल पाणी गुणवत्तेचा निष्कर्ष, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता तपासणी, माती गुणवत्तेचा निष्कर्ष, जैव पर्यावरण, अध्ययन क्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, सामाजिक आर्थीक पर्यावरण, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, ऑनलाईन निरीक्षण प्रणाली (OCEMS) पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, हरितपटटा विकास व त्याचे छायाचित्रे, व्यावसायिक निरीक्षण कार्यक्रम तपशील, पर्यावरण व्यवस्थापन कक्ष माहिती, सामाजिक बांधिलकी, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती पेन ड्राइव्ह मध्ये रेकॉर्डीग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, परभणी यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही पर्यावरणविषयक प्रश्न, सुचना, टिप्पणी, विचार इ. मांडायचे असतील तर ते त्यांनी त्यांचे नांव व गावाचे नांव सांगून विचारावेत.



होळकर

जाहीर लोकसूनावणी दरम्यान उपस्थित नागरिकांनी सदर प्रकल्पा संबधी काही प्रश्न उपस्थित केले त्याबाबतची प्रकल्प प्रतिनिधी/ सल्लागार कडून उत्तर देण्यात आली ती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व व्यक्तीचे नांव. | उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर. |
|---|---|---|
| १. | **श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, परभणी** यांनी प्रकल्पाचे सल्लागार यांना प्रश्न विचाराला की, प्रकल्पाच्या सादरीकरणामध्ये आपण गट नंबर १४९, १६५, १६६ असे तीनच गट नंबर दाखविले आहेत परंतु ईआयए ड्राफट मध्ये एकूण आठ गट नंबरचा समावेश आहे याबाबतीत स्पष्टीकरण देण्यात यावे. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, सदर प्रकल्पाचे एकूण क्षेत्र हे २९.३७ हेक्टर एवढे असून यामध्ये एकूण आठ गट नंबर येतात परंतु सादरीकरणामध्ये नजरचूकीने तीनच गट नंबर दाखविण्यात आले आहेत यामध्ये सुधारणा करण्यात येईल. |
| २. | **श्री. मारोती बकान, सरपंच, रा. कानडखेड, ता. पुर्णा, जि. परभणी** यांनी विचारले की, सदर उद्योगाच्या विस्तारीकरणामुळे प्रकल्पाची क्षमता मोठया प्रमाणात वाढणार आहे यामुळे या उद्योगास कर्मचारी/कामगार किती लागणार आहेत. तसेच त्यांनी प्रकल्प व्यवस्थापकांना विनंती केली की, येथील स्थानिक नागरिकांनाच रोजगारामध्ये प्रथम प्राधाण्य देण्यात यावे. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, सदर विस्तारीकरण प्रकल्पामध्ये जवळपास १२० वाढीव नवीन कामगार घेण्यात येणार आहेत. यामध्ये कूशल/अकुशल कामगारांच्या पात्रतेनुसार घेण्यात येतील व यामध्ये जास्तीत जास्त याच भागातील स्थानिक नागरिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे. |
| ३. | **श्री. राम तुकाराम वाघमारे, रा. आजदापुर** यांनी विचारले की, सदर साखर कारखाना विस्तारीकरण प्रकल्पामुळे साखर क्षमतेमध्ये वाढ होणार आहे यामुळे येथील आजुबाजूच्या शेतक-यांचा काय फायदा होईल. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, सदर साखर कारखाना व नवीन विस्तारीकरण प्रकल्प हा शेतीशी निगडीत आहे. साखर कारखाना विस्तारीकरण प्रकल्पामुळे उस गाळप क्षमता वाढणार आहे. वेळेवर उस गाळप होईल त्यामूळे आजुबाजूच्या शेतक-यांना उस उत्पादन अधिक प्रमाणात घेता येईल, उसाला योग्य दर मिळेल याचा येथील शेतक-यांचा नक्कीच फायदा होईल. |
| ४. | **श्री. माधव आनंदाराव कदम, रा. करंडेश्वर,** यांनी विचारले की, सदरच्या विस्तारीकरण प्रकल्पाचे काम पुर्ण होण्यासाठी अंदाजे किती कालावधी लागणार आहे. | **यावर प्रकल्प सल्लागार**, यांनी सांगितले की, सदर विस्तारीकरण प्रकल्पाचे काम हे प्राथमिक टप्प्यात आहे. आजची पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी हि पर्यावरण मान्यतेसाठी घेण्यात येत आहे. राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ मुल्यांकन समिती, महाराष्ट्र शासन यांची परवानगी मिळाल्यानंतर सदर प्रकल्प साधारणत: १२ महिन्यात सुरू होईल. |



होळकर

| | | |
|---|---|---|
| ५. | **श्री. योगेश कदम, रा. कानडखेड,** यांनी विचारले की, सदर विस्तारीकरण प्रकल्पामुळे कारखान्याची क्षमता वाढणार आहे यामुळे हवेचे प्रदुषण व पाण्याचे प्रदुषण होणार नाही यासाठी कारखान्याने काय काय उपाययोजना करणार आहेत याबदल सांगावे. | **यावर प्रकल्प सल्लागार,** यांनी सांगितले की, साखर कारखान्यामध्ये तयार होणा-या बगॅसचा इंधन म्हणून वापर करण्यात येईल त्यामुळे हवेच्या प्रदूषणाचे प्रमाण फार कमी होते. तसेच प्रस्तावित ११० टनाच्या बॉयलरसाठी ८० मीटर उंच चीमणी बसविण्यात येणार आहे. तसेच हवेच्या प्रदूषणासाठी कारखाना प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रणाली ईएसपी (इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसीपिटेटर) बसविण्यात येणार आहे ज्याची क्षमता ९९.९ टक्के इतकी आहे. यामूळे सदर प्रकल्पातील बॉयलरमधून जाणारी धूळ आजूबाजूच्या परीसरामध्ये तसेच हवेत जाणार नाही त्यामूळे हवेचे प्रदूषण होणार नाही.<br>पुढे सांडपाण्याविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, सांडपाणी कारखाण्याच्या बाहेर जाणार नाही यासाठी पूर्ण काळजी घेण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत असलेल्या कारखाण्यामध्ये अत्याधुनिक सांडपाणी प्रक्रिया (इटीपी) ५०० घन मीटर प्रति दिन इतक्या क्षमतेचा आहे. प्रस्तावित विस्तार प्रकल्पामध्ये याचे अपग्रेडेशन करून १००० घन मीटर प्रति/ दिन इतका सांडपाणी प्रक्रिया (इटीपी) तयार करण्यात येणार आहे. यामध्ये कारखाण्यातून निर्माण होणारे सांडपाणी प्रक्रीया करून ते कारखाणा परीसरातील हरित पटटा (ग्रीन बेल्ट) विकास करण्यासाठी वापरले जाईल. म्हणजेच कूठलेही सांडपाणी कारखाण्याच्या बाहेर जाणार नाही त्यामूळे पाण्याचे प्रदुषण होणार नाही. |
| ६. | **श्री. मनिष होळकर, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर** यांनी प्रकल्पाचे सल्लागार यांना विचारले की, सद्यस्थीतीत सुरू असलेल्या कारखान्यामध्ये ८१ मीटर उंच चिमणी ८० टीपीएच बॉयलरला बसविलेली आहे व प्रस्तावित प्रकल्पामध्ये ११० टीपीएच बॉयलरसाठी ८० मीटर उंच चिमणी दर्शविलेली आहे म्हणजे १ मीटरचा फरक आहे, याबदलचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | **यावर प्रकल्प सल्लागार,** यांनी सांगितले की, विद्यमान कारखान्यामध्ये सीपीसीबी च्या मानकानुसार ८० टीपीएच बॉयलर व १४ टीपीएच बॉयलर यासाठी संयुक्तपणे ८१ मीटर उंच चिमणी आहे. तसेच सीपीसीबी च्या मानकानुसार ११० टीपीएच बॉयलरसाठी बॉयलरसाठी ८० मीटर उंच चिमणी बसविण्याचे प्रस्तावित आहे<br>**पुढे यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, परभणी** यांनी प्रकल्प व्यवस्थापकांना सांगितले की, सदर ८० टीपीएच बॉयलर व १४ टीपीएच बॉयलर यासाठी ८१ मीटर उंच |



होळकर

| | | |
|---|---|---|
| | | चिमणी एकत्रित बसविल्या बाबतचा उल्लेख महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्रामध्ये सुधारित करून घेण्यात यावा. |
| ७. | **श्री. दिगंबर सुर्यवंशी, रा. कानडखेड** यांनी विचारले की, सदर कारखान्यामध्ये सभासद नोंद असल्याशिवाय इतरांचा उस घेण्यात येत नाही. प्रस्तावित नविन विस्तारीकरण झाल्याबर कारखाना सभासद नोंद असलेल्या शेतक-यांचा उस घेणार का किंवा इतर जे सभासद नाहीत अशा शेतक-यांचाही उस घेणार का याबतीत सांगावे. | **यावर प्रकल्पाचे चेअरमन,** यांनी सांगितले की, सदर कारखान्यामध्ये आजुबाजूच्या सर्व गावातील शेतक-यांचा उस घेतला जाईल यामध्ये सभासद नोंद असलेल्या शेतक-यांना प्रथम प्राधाण्य देण्यात येईल. त्यानंतर इतर शेतक-यांचा उस घेतला जाईल. |
| ८. | **श्री. मारोती बकान, सरपंच, कानडखेड,** यांनी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती चे अध्यक्ष यांना विनंती केली की, सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाला मान्यता देण्यात यावी व प्रकल्प लवकरात लवकर सूरु करण्यात यावा. | **यावर श्री. सो. म. कुरमुडे, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, परभणी** यांनी सांगितले की, आपण मांडलेल्या सुचनांची नोंद घेण्यात आली आहे. |

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा उपविभागीय दंडाधिकरी, गंगाखेड श्री जीवराज डापकर, यांनी सर्वप्रथम परिसरातील उपस्थित सर्व नागरिक, कंपनीचे चेअरमन व म.प्र.नि. मंडळाचे सर्व अधिकारी यांचे आभार व्यक्त केले. पुढे त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात आलेली असून यामध्ये मी अध्यक्ष, तसेच पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे सदस्य श्री. होळकर साहेब, समितीचे समन्वयक श्री. कुरमुडे साहेब येथे हजर आहोत. आज आपण मे. बळीराजा साखर कारखाना लिमिटेड या उद्योगाच्या प्रस्तावित विस्तार प्रकल्प ज्यामध्ये साखर कारखान्याची उत्पादन क्षमता ३५०० टीसीडी ते १०००० टीसीडी पर्यंत वाढविणे आणि सहवीज निर्मिती १५ मेगावॅट ते ४० मेगावॅट उत्पादन बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी जमलो आहोत. याबाबत प्रकल्पाचे सल्लागार यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केलेले आहे. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. ०३/०४/२०२५ रोजी दैनिक सकाळ, दैनिक देशोन्नती (मराठी भाषा) व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी भाषा) या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने काही सूचना इमेलद्वारे प्राप्त झालेल्या आहेत. तसेच येथे उपस्थित नागरीकांनी मांडलेले प्रश्न, सुचनांची उत्तरे प्रकल्पाचे सल्लागार व प्रकल्प संचालक यांच्याकडून देण्यात आलेली आहे. यांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे



होळकर

तसेच या सर्व बाबींचा इतिवृत्तात समावेश करण्यात येईल व पुढिल कार्यवाहीसाठी शासनास पाठविण्यात येईल. उपस्थित नागरिकांना अजुनही काही प्रश्न, टिका, टिप्पणी मांडायचे असतील तर ते मांडू शकता कारण सदर लोकसुनावणी ही आपल्या पर्यावरण विषयक प्रश्नासाठी आहे असे त्यांनी सांगितले. तदनंतर नागरिकामधून पुढे कुठलाही प्रश्न आला नाही. शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी संपन्न झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

| | | |
|---|---|---|
| **सो. म. कुरमुडे**<br>(समन्वयक)<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, परभणी | **मनिष होळकर**<br>(सदस्य)<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर | **जीवराज डापकर**<br>**उपविभा(अध्यक्ष)अधिकारी**<br>**गंगाखेड उपविभाग जि. परभणी**<br>उपविभागीय दंडाधिकारी गंगाखेड |